# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- सफाई मजदूर जे वाहन चालकाचे तसेच संगणक लिपिकिय व **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** मसाज इत्यादी काम करीत होते असे एकुण ५४ ऐवजदार सफाई कामगारांना सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रका प्रमाणे कुशल कामागाराचे वेतन देण्याची मा. तत्कालिन आयुक्त यांनी दि. २८/१२/२०१५ रोजी मंजुरी दिली होती. परंतु सदर मंजुरीवर महापौर कार्यालयात तक्रार प्राप्त झाल्यामुळे तत्कालिन मा. महापौर यांनी केलेल्या आदेशाप्रमाणे तत्कालिन मा. आयुक्त यांचे दि. १९/०३/२०१६ रोजी आदेशान्वये स्थगिती देण्यात आली. सध्या स्थितीत सदर आदेशावरील स्थगीती कायम आहे. ५४ कुशल कामगार पैकी श्री. मनोज हिरामन धनविजय यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. ०८/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये मा. तत्कालिन आयुक्त यांचे दि. २८/१२/२०१५ चे आदेशावर दिलेल्या स्थगनादेशावर ४ आठवडयात अंतिम निर्णय घेण्यात यावा असे निर्देशित केले आहेत. त्या अनुषंगाने स्थगीती कायम असलेल्या दि. २८/१२/२०१५ चा आदेश कायमस्वरुपी निरस्त करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मा. प्रशासक यांचे विचारार्थ सादर.

टिप :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 126/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 02/11/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सफाई मजदूर जे वाहन चालकाचे तसेच संगणक लिपिकिय व मसाज इत्यादी काम करीत होते असे एकुण ५४ ऐवजदार सफाई कामगारांना सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रका प्रमाणे कुशल कामागाराचे वेतन देण्याची मा. तत्कालिन आयुक्त यांनी दि. २८/१२/२०१५ रोजी मंजुरी दिली होती. परंतु सदर मंजुरीवर महापौर कार्यालयात तक्रार प्राप्त झाल्यामुळे तत्कालिन मा. महापौर यांनी केलेल्या आदेशाप्रमाणे तत्कालिन मा. आयुक्त यांचे दि. १९/०३/२०१६ रोजी आदेशान्वये स्थगिती देण्यात आली. सध्या स्थितीत सदर आदेशावरील स्थगीती कायम आहे. ५४ कुशल कामगार पैकी श्री. मनोज हिरामन धनविजय यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. ०८/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये मा. तत्कालिन आयुक्त यांचे दि. २८/१२/२०१५ चे आदेशावर दिलेल्या स्थगनादेशावर ४ आठवडयात अंतिम निर्णय घेण्यात यावा असे निर्देशित केले आहेत. त्या अनुषंगाने स्थगीती कायम असलेल्या दि. २८/१२/२०१५ चा आदेश कायमस्वरुपी निरस्त करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**